MHPU180001102010

## निशाणी क्र.१६७ वरील आदेश
## (दिनांक १४.०२.२०२३)

१. प्रस्तुत अर्ज वादी क्र. १ तर्फे मयत प्रतिवादी क्र. १ यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेतले नाहीत म्हणुन मे. कोर्टाने त्यांच्या विरुध्दच्या मागणींबाबत प्रतिवादी क्र. १ पुरता दावा अबेट केला आहे. तो आदेश सेटअसाईड करुन मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. त्यांचे असे कथन आहे की, सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द निरंतर मनाईकरीता व जाहीर ठरावासाठी दाखल केलेला आहे. दावा चालु असतांना दाव्यातील प्रतिवादी क्र. १ यांचेसह इतर प्रतिवादींनी संगनमत करुन दाव्यातील प्रतिवादी क्र. १५ यांना दावा मिळकतीची बेकायदेशीर विक्री केलेली असल्याने वादी यांनी दाव्यात दुरुस्ती करुन प्रतिवादी क्र. १५ यांना जे बेकायदेशीर खरेदीखत करुन दिलेले आहे ते प्रतिवादी यांच्याकडुन सदर खरेदीखत रद्द करुन मागितले आहे. प्रतिवादी क्र. १ हे वकीलांमार्फत हजर होउन वादीच्या दाव्यास कैफियत व जबाब दाखल केल्यापासुन ते आजपर्यंत मे. कोर्टात कधीही हजर झालेले नाही. असे असतांना दावा वादीचा पुरावा घेणेकामी नेमलेला असतांना वादी यांनी त्यांचे सरतपासणीचे सत्यप्रतिज्ञापत्र दि. ०१/१०/२०१८ रोजी नि. १०८ वर दाखल केलेले आहे. ते प्रतिज्ञापत्र दाखल असतांना प्रतिवादी क्र. १ ने स्वतः अगर त्यांचे वकीलांमार्फत वादीचा उलटतपास घेणेकामी हजर झालेले नव्हते व नाही. अशी वस्तुस्थिती असतांना प्रतिवादी क्र. १५ यांच्या वकीलांनी कोर्टास तोंडी कथन केले की, प्रतिवादी क्र. १ हे मयत झालेले आहे. तसा अर्ज व मृत्युचा दाखला नि. ११५ वर दाखल केलेला आहे. त्यानंतर वादी यांनी प्रतिवादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी ब–याच वेळा चौकशी करुनही त्यांना किती वारस मुले व मुली आहेत याबाबत खात्रीशीर माहिती मिळाली नसल्याने प्रतिवादी क्र. १ मयत यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास कायदेशीर अडचण निर्माण झाली. परंतु मे. कोर्टाने दि. १२/०६/२०१९ रोजी प्रतिवादी क्र. १ मयत यांचे वारस योग्य त्या मुदतीत रेकॉर्डवर घेतले नाहीत. म्हणुन त्यांचेविरुध्दच्या मागणींबाबत प्रतिवादी क्र. १ पुरता दावा अबेट केला आहे. दावा हा स्थावर मिळकतीसंदर्भात असल्याने वादीचा सदर दाव्यामध्ये कायदेशीर हक्क व हितसंबंध अधिकार असल्याने प्रतिवादी क्र. १ यांनी या वादींचा हिस्सा डावलण्याच्या हेतुने त्यांच्या नावे दावा मिळकत असल्याने त्यांनी ति–हाईत इसमास बेकायदेशीरपणे विक्री केलेली आहे. प्रतिवादी क्र. १ आवश्यक पार्टी असल्याने त्यांचे मागणीविरुध्द त्यांचे कायदेशीर वारस रेकॉर्डवर घेउन त्यांच्याही विरुध्द न्याय मागणे जरुरीचे झाले आहे. म्हणुन सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. या सर्व कारणास्तव वादी क्र. १ ने त्यांचा

अर्ज मंजुर व्हावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र.१५ यांनी सदर अर्जावर जबाब लिहुन दिला आहे. त्यांचे असे कथन आहे की, सदरचा अर्ज नामंजुर करावा. जर अर्ज मंजुर करावा असे मे. साहेब यांचे मत पडले, सदर अर्जाचे कामी योग्य ते न्यायाचे आदेश होणेस हरकत नाही.

४. प्रतिवादी क्र. १४ यांचेविरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश दि. १६/०७/२०१४ रोजी तसेच प्रतिवादी क्र. ५अ ते ५क विरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचे आदेश दि. १२/०४/२०१८ रोजी झाले आहे. तसेच प्रतिवादी क्र. २, ३, ४, ६ ते १३ यांचेविरुध्द दावा विनाकैफियत चालविण्यात येण्याचा आदेश दि. १२/०४/२०१८ रोजी झालेला आहे.

५. वादीतर्फे विद्वान वकील श्री. एस.बी.चव्हाण व प्रतिवादी क्र. १५ तर्फे विद्वान वकील श्री. बी.व्ही.देशमुख यांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला.

६. अभिलेखाची पडताळणी केली असता असे दिसुन येते की, दि. ०३/०४/२०१० रोजी वादी क्र. १ ते ८ यांनी प्रस्तुत दावा जाहीर ठराव व निरंतर मनाईकरीता दाखल केला आहे. दि. ०७/०४/२०१० रोजी दाव्यास क्रमांक पडलेला आहे. त्याचदिवशी प्रतिवादींना समन्स काढण्याचे आदेश झालेला आहे. दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १५ यांनी नि. १०३ अन्वये त्यांची कैफियत व जबाब दाखल केलेला आहे. माझे पुर्वाधिकारी यांनी दि. १३/०७/२०१८ रोजी नि. १०७ अन्वये मुद्दे काढलेले आहे. त्यानंतर दावा वादीच्या पुराव्याकरीता नेमण्यात आला. वादी क्र. १ विश्वनाथ राधु उर्फ राघोबा मोरे यांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दि. ०१/१०/२०१८ रोजी नि. १०८ अन्वये दाखल केलेले आहे. त्यांचा पुढील सरतपास व उलटतपास होण्यापुर्वी वादी क्र. १ हे दि. ०३/११/२०२० रोजी मयत झाले व त्यांचे नावापुढे मयत असे लिहुन त्याचे वारस म्हणुन १अ ते १ड यांना दाव्यात सामील करुन दुरुस्ती केलेली आहे. प्रतिवादी क्र. १ कोंडाबाई सोनवणे दि. २३/०८/२०१८ रोजी मयत झालेली आहे. त्यांचे वारस रेकॉर्डवर न घेतल्यामुळे दावा त्यांचे विरुध्द अबेट झाल्याचा आदेश माझे पुर्वाधिकारी यांनी दि. १२/०६/२०१९ रोजी झालेला आहे. तो आदेश रद्द करण्यासाठी वादीतर्फे दि. १९/०६/२०१९ रोजी अबेटमेंट सेट असाईडचा प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १५ यांनी नि. ११५ अन्वये पुरसीस नुसार प्रतिवादी क्र. १ कोंडाबाई नाना सोनवणे दि. २३/०८/२०१८ रोजी मयत झाले असुन त्यांना मुलगा विजय व मुलगी शांताबाई एक मयत मुलीचे वारस असे वारसदार आहेत असे कथन केले आहे. तसेच नि. ११७ यादीलगत कोंडाबाई नाना सोनवणे यांचा मृत्युचा दाखला नि. ११८ वर दाखल केलेला आहे. नि. ११८ वरील मृत्यु

प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता कोंडाबाई नाना सोनवणे हे दि. २३/०८/२०१८ रोजी मयत झाल्याचे दिसते. त्यानंतर दि. २२/११/२०१८ पर्यंत वादीने अर्ज दाखल केला नाही. त्यानंतर दि. १९/०६/२०१९ पावेतो त्यांचे वारस वादीतर्फे घेण्याचा अर्ज ६ महिने व २७ दिवसांचा विलंब झालेला दिसुन येतो.

७. अर्जात नमुद कारणे पाहता प्रतिवादी क्र. १५ यांनी दि. २९/११/२०१८ रोजी म्हणजे प्रतिवादी क्र. १ मयत झाल्यानंतर ९७ दिवसांनंतर पुरसीस अन्वये प्रतिवादी क्र. १ मयत असल्याचा मृत्युचा दाखला व त्यांच्या वारसांची माहिति दिल्याचे नि. ११५ व ११८ वरुन दिसुन येते. त्यानंतर वादींना प्रतिवादी क्र. १ चे वारसांची खात्रीशीर माहिती मुदतीत मिळालेली नाही. म्हणुन माझे पुर्वाधिकारी यांनी प्रतिवादी क्र. १ विरुध्द दावा अबेट करण्याचा आदेश केला आहे. दावा हा निरंतर ताकीद व जाहीर ठराव याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश सेट असाईड करुन त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. उपरोक्त सर्व विवेचन, कारणास्तव प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो. करीता मी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.१६७ र.रु. १०००/– (रुपये एक हजार फक्त) खर्च प्रतिवादी क्र. १५ यांना पुढील तारखेपर्यंत द्यावे या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. वादी क्र. १ ने खर्चाची रक्कम दिल्यानंतर प्रतिवादी क्र. १ कोंडाबाई नानासाहेब सोनवणे यांचेविरुध्द दि. १२/०६/२०१९ रोजी झालेला अबेटमेंटचा आदेश सेट असाईड करण्यात येईल.

३. वर नमुद आदेशाची पुर्तता पुढील तारखेपर्यंत न झाल्यास वादी क्र. १ यांचा अर्ज नि.१६७ नामंजुर झाला असे समजण्यात येईल.

४. वर नमुद १ ते ३ बाबींची वादी क्र. १ व त्यांच्या वकिलांनी नोंद घ्यावी.

JYOTI BHARAT GOYAL
Digitally signed by JYOTI BHARAT GOYAL
Date: 2023.02.15 13:06:12 +0530

(श्रीमती. जे.एस.खेडकर–गोयल)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दौंड
ता.दौंड, जि. पुणे

दि.१४.०२.२०२३

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this PDF file Order are same word for word as per original Order"

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | :- | P.D.Jagatap |
| Court name | : | Smt. J. S. Khedkar-Goyal,<br>J.M.F.C, (Court no.1), Daund,<br>Tq.Daund, Dist.Pune |
| Order date | : | 14/02/2023 |
| Order signed by<br>Presiding Officer on | : | 14/02/2023 |
| Order uploaded on | : | 15/02/2023 |